ePaper

## कर्नाटक उच्च न्यायालयाच्या 6 न्यायाधीशांना ठार मारण्याची धमकी




| वर्ष - 7 | अंक - 84 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत


- पाकिस्तानचा खोटारडेपणा
- मौत का सौदागर
- 74 रोहिंग्या मुस्लिमांना अटक
- पूरग्रस्तांना 10 हजार



www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 25 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# जनसंवाद सभेत तक्रारींचा ‘पाऊस’!

## » नागरिकांची मागणी : प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद

। पिंपरी

। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, पाणीपुरवठा पुरेशा दाबाने करावा, रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम वेगाने करावे अशी मागणी नागरिकांनी जनसंवाद सभेत केली.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आणि आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन सर्व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये करण्यात येते. आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण ७० तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे १६,११, ४, २, ६, ११, १० आणि १० तक्रारवजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या

अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, अजय चारठाणकर यांनी भूषवले. तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, आण्णा बोदडे, किरण मोरे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, शितल वाकडे, उमेश ढाकणे उपस्थित होते.

### पावसाच्या पाण्याचे नियोजन करावे...

» पावसाच्या साठलेल्या पाण्याचे नियोजन करावे, शहरपरिसरात वेळोवेळी किटकफवारणी करण्यात यावी, बसथाब्यांचे नुतनीकरण करण्यात यावे, खराब झालेल्या ड्रेनेज लाईन्स दुरूस्त करण्यात याव्यात अशा तक्रारींचा प्रामुख्याने समावेश होता. महापालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयाचे नुकतेच स्थलांतर झाले असल्याने नवीन प्रभाग इमारतीत पहिलीच जनसंवाद सभा पार पडली, त्यासही नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

### प्रशासनाच्या समन्वयकांना सूचना...

» सभेचे अध्यक्ष तथा मुख्य समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या मनपा क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांना महापालिकेच्या अनुषंगाने असलेली कामे, अडचणी, तक्रारी, सूचना या सर्व बाबींची नोंद घेऊन संबधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेकडून दिल्या गेल्या आहेत.

# ‘देहूरोड कॅन्टोन्मेंट’च्या समावेशाच्या हालचाली

## » नगरविकास विभागाकडे अहवाल : मंजुरीनंतर संरक्षण मंत्रालयाला पाठवणार!

। पिंपरी । महाईन्यूज ।

**देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने महापालिका अथवा नगरपालिकेमध्ये समावेशाचा आपला अहवाल नगर विकास विभागाला सुपूर्द केला आहे. हा विभाग त्यावर विचारविनिमय करून अहवाल संरक्षण मंत्रालयाला पाठवणार आहे.**






देशात ६२ कॅन्टोन्मेंट बोर्ड असून वस्तू व सेवाकर लागू झाल्यापासून बोर्डाचे आर्थिक उत्पन्न समाप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर या कॅन्टोन्मेंट बोर्डाचा नजीकच्या नगरपालिका किंवा महापालिकेत समावेश करावा, याबाबत केंद्र सरकारने चाचपणी सुरू केली आहे.

यासंदर्भात केंद्र सरकारने एक समिती गठीत केली होती. या समितीकडे कॅन्टोन्मेंट बोर्डाने दोन महिन्यांत अहवाल सादर करण्यास सांगितले होते. त्यानुसार, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने अहवाल तयार केला असून त्यात नकाशा, जमिनीचा प्रकार, खासगी क्षेत्र आदी माहिती भरून अहवाल नगर विकास मंत्रालयाकडे सुपूर्द केला आहे. त्याच्या कॉपी एमओडी आणि भारत सरकार यांच्याकडे पाठवण्यात आल्या आहेत.

नगर विकास खात्याने या अहवालाचे अध्ययन करून तो संरक्षण मंत्रालयाकडे ३० जुलैपर्यंत पाठवावयाचा आहे. त्यानंतर वरिष्ठ पातळीवरती एक बैठक होणार आहे.

या बैठकीत कॅन्टोन्मेंट बोर्ड महानगरपालिकेत समाविष्ट करावे की नाही, याबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. बहुतांशी गावांनी महापालिकेत जाण्यास सकारात्मकता दर्शवली आहे, तर काहींचा विरोध आहे.

> “ संरक्षण मंत्रालयाच्या आदेशानुसार देहूरोड बोर्डाचा खासगी जमिनीचा अहवाल तयार करून हा अहवाल नगरविकास मंत्रालयाकडे पाठविण्यात आला आहे.
>
> – **राजन सावंत** कार्यालय अधीक्षक, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड.

# हेलिकॉप्टरसाठी अनुदान द्या

## शेतकरी महिलेची तहसीलदारांकडे मागणी

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील एका शेतकरी महिलेने तहसीलदारांकडे एक अजब मागणी केली आहे. माझ्या शेतात जायला रस्ता नसल्याने मला शेतात जाण्यासाठी हेलिकॉप्टर खरेदी करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे. त्यासाठी शासकीय अनुदान द्यावे, असे देखील संबंधित महिलेचे म्हणणे आहे.**



### शेतात जायला रस्ता नाही

» शेतामध्ये काढणीला आलेले पीक शेतात जाण्यासाठी रस्ता नाही, त्यामुळे माल मुख्य रस्त्यावर कसा घेऊन जायचा हा प्रश्न तिच्यासमोर होता. रस्ता नाही त्यामुळे आता हेलिकॉप्टर खरेदी केल्याशिवाय आता पर्याय नाही, त्यामुळे या शेतकरी महिलेने थेट तहसीलदारांकडे हेलिकॉप्टर खरेदीसाठी अर्ज केला असून त्यासाठी अनुदान मिळावे असे देखील त्यात नमूद करण्यात आले आहे.

खुद्द तहसीलदारांनी शेतीची पाहणी करण्याचे आदेश देऊनही येथील मंडलाधिकाऱ्यांना वेळ नसल्याने महिलेने अशी मागणी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शिरूर तालुक्यातील निमोणे गावच्या महिला शेतकरी लताबाई भास्कर हिंगे यांना स्वतःच्या शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने दि ५ डिसेंबर २०२२ रोजी १९६६ च्या कलम १४३ अन्वये शिरूर तहसिल कार्यालयात रस्ता मागणीचा अर्ज केला होता. त्या अर्जावर तत्कालीन तहसीलदार यांनी सुनावणी घेऊन संबंधित मंडळ अधिकारी यांना स्थळ पाहणी करण्याचे आदेश दिले आहेत.

मात्र आदेश प्राप्त झाल्यापासून मंडळ अधिकाऱ्यांना लताबाई हिंगे यांनी भेटण्याचा प्रयत्न केला. मात्र ते काही भेटले नाहीत. अनेक हेलपाटे मारल्यानंतर मंडल अधिकाऱ्यांची आणि त्यांची भेट झाली. तेव्हा ते म्हणाले की, सध्या नवीन बदली होऊन इथे आलो आहे, मला सध्या वेळ नाही असे उत्तर त्यांनी त्या शेतकरी महिलेला दिले. त्यामुळे शेतकरी महिला संतप्त झाली.

# पत्नी आणि पुतण्यावर गोळी झाडून आत्महत्या

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

अमरावतीमध्ये कार्यरत असलेले सहायक पोलिस आयुक्त भारत गायकवाड यांनी आपल्या पत्नी आणि पुतण्याचा गोळी घालून हत्या केली आणि त्यानंतर स्वत:ला गोळी घालून आत्महत्या केली. या घटनेमुळे पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.

अमरावतीमध्ये कार्यरत असल्याने भारत गायकवाड हे सुट्टी घेऊन पुण्यात आले होते. गायकवाड जेव्हा सुट्टी घेऊन पुण्यात येतात तेव्हा त्यांचा पुतण् दीपक हा त्यांच्यासाठी मटण घेऊन बाणेर येथे जात असे. शनिवारी सुट्टी म्हणून ते पुण्यात आपल्या घरी आले होते. काका म्हणजे भारत गायकवाड जेव्हा पुण्यात येतात त्यावेळी त्याचा पुतण्या दीपक गायकवाड त्यांच्यासाठी न चुकता मटण घेऊन जात असतो.

काल (रविवारी) रात्री घरातील सर्वांचे जेवण झाल्यानंतर दीपक गायकवाड हा पाऊस सुरू असल्याने धायरी येथील आपल्या घरी जाऊ शकला नाही. तो काका भरत गायकवाड यांच्या बाणेर येथील घरी थांबला. बाणेर येथील घरात काका भरत यांच्यासह त्यांची आई, पत्नी मोनी गायकवाड लहान मुलगा आणि पुतण्या असे ५ जण होते.

भरत गायकवाड यांनी दीपकला गोळी मारली. मुलाने रुममध्ये पाहिले असता त्याची आई मोनी गायकवाड गोळी लागून खाली पडली होती. त्यानंतर आई आणि मुलाने भरत यांना अडवण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी सर्वांना बाहेर ढकलून दिले आणि स्वत:ला गोळी मारून आत्महत्या केली. या घटनेत पहिली गोळी भारत गायकवाड यांनी छतावर झाडली. दुसरी गोळी पत्नी मोनीवर झाडली ज्यात त्यांचा मृत्यू झाला. तिसरी गोळी पुतण्या दीपक गायकवाड यांच्यावर झाडली. चौथी गोळी कुटुंबियांना घाबरवण्यासाठी तर पाचवी गोळी स्वत:वर झाडून घेतली.

# पुणेकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, पानशेत, टेमघर आणि वरसगाव या धरण प्रकल्पात आता पिण्यासाठी वर्षभर पुरेल एवढा पाणीसाठा जमा झाला आहे. त्यामुळे पुणेकरांच्या पिण्याच्या पाण्याची तूर्त चिंता मिटली आहे. धरणांमध्ये सोमवारी सायंकाळपर्यंत १७.२१ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा जमा झाला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत ३.२७ टीएमसी पाणीसाठा कमी आहे. गेल्या काही दिवसांपासून खडकवासला साखळी प्रकल्पातील धरणात संततधार पावसाने चांगली हजेरी लावली. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात चांगली वाढ होत आहे.

पावसाचा जोर फारसा वाढला नसला, तरी घाटमाथ्यासह धरण क्षेत्रातील पावसाच्या हजेरीमुळे धरणातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाली आहे. त्यामुळे आजमितीला खडकवासला साखळी प्रकल्पात ५९.०३ टक्के म्हणजेच १७.२१ टीएमसी एवढा पाणीसाठा जमा झाला



आहे. गेल्या वर्षी याच दिवशी धरण प्रकल्पात २०.४८ टीएमसी (७०.२८ टक्के) पाणीसाठा होता. त्या तुलनेत सध्या ३.२७ टीएमसी पाणीसाठा कमी आहे. आज दिनांक २४ जुलै २०२३ रोजी खडकवासला धरण ८२% टक्के क्षमतेने भरले आहे.तरी धरण क्षेत्रात सततच्या पडत असणाऱ्या पावसामुळे धरण पातळीमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे येत्या २४ ते ४८ तासांमध्ये खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग सुरू करण्याची दाट शक्यता आहे.यामुळे पाटबंधारे विभागाकडून नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदीपात्रात तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुणे-मुंबई वाहतूक दुहेरी करा

## छावा मराठा संघटनेकडून मागणी

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मेट्रोच्या कामानिमित्त गेल्या चार वर्षापासून बंद असलेला मुंबई-पुणे जुना महामार्ग बोपडी ते खडकी स्टेशन दरम्यान एकेरी करण्यात आला आहे. परिणामी बोपोडी ते खडकी बाजार रस्त्यावरील वाहतूक एकेरी करण्यात आली. त्यामुळे बोपोडी, दापोडीकडे येताना शाळकरी मुले, वाहनचालक, नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. आता मेट्रोचे काम पूर्ण झाले असूनही रस्ता का बंद ठेवण्यात आला आहे, असा सवाल छावा मराठा संघटनेचे पुणे जिल्हाप्रमुख रामभाऊ जाधव यांनी केला आहे.**



अगोदरपासून येथील मेट्रोचे काम सुरू करण्यात आले होते. गेली चार वर्ष हे काम सुरू आहे. त्यामुळे जुन्या मुंबई पुणे महामार्गावरील बोपोडी ते खडकी स्टेशन दरम्यान वाहतूक एकेरी करण्यात आली आहे. ही वाहतूक खडकी बाजार मार्गे वळवण्यात आली. त्यामुळे शिवाजीनगरकडे जाणाऱ्या वाहनांना मिलिटरी हद्दीतून आरे चौकात येऊन पुढे शिवाजीनगरला जावे लागत आहे. दरम्यान, ही वाहतूक शाळांच्या समोरून जात असल्याने शाळकरी मुलांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

या वाहतुकीमुळे शाळा, महाविद्यालये सुटण्याच्या वेळी मोठी वाहतूक कोंडी होते. परिणामी खडकी बाजारकडून बोपोडीकडे येणारा रस्ता एकेरी करण्यात आला आहे. त्यामुळे खडकी बाजारकडून बोपोडी, दापोडीकडे येताना नागरिकांना वळसा घालून खडकी स्टेशन मार्गे बोपोडीत यावे लागत आहे.

### प्रशासनाने सहनशीलता पाहू नये

» छावा मराठा संघटना पुणे जिल्हाप्रमुख रामभाऊ जाधव म्हणाले, पालखी सोहळ्यापूर्वी हा रस्ता खुला करण्याचे आश्वासन मेट्रो प्रशासनाकडून देण्यात आले होते. मात्र, पालखी सोहळा होऊन महिना उलटूनही अद्याप रस्ता सुरू करण्यात आलेला नाही. तिथे सिमेंटचे पाईप आडवे लावण्यात आले आहेत. रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे, तर रस्ता का बंद ठेवण्यात आला आहे? याचा सर्वाधिक फटका विद्यार्थी, पालकांना बसत आहे. ही वाहतूक खडकीतील अनेक शाळांच्या समोरून जात असल्याने शाळकरी मुलांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. नागरिकांच्या सहनशीलतेचा प्रशासनाने अंत पाहू नये.

# पर्यावरण प्रेमींची 'ऑक्सिजन फॅक्टरी'!

## » मल्हारगडावर 121 झाडांचे रोपण : एक लाख वृक्षारोपणाचा संकल्प



। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड, पुणे शहरातील कामगार डॉक्टर, अभियंते, पर्यावरण प्रेमी व सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्रित आपला परिवार सोशल फाउंडेशन पुणे स्थापन केला. मल्हार गड सेवा समिती विठ्ठलवाडी देहू यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद यांची जयंती आणि अधिक मासातील रविवार निमित्ताने देहू परिसरातील मल्हार गडावर 121 देशी झाडांचे वृक्षारोपण करुन खरोखरच एक ऑक्सिजन फॅक्टरीचे ओपनिंग मोठ्या थाटामाटात साजरे करण्यात आले.**

सकाळी 7.30 वा. मल्हार गडावर साधारण 225 सदस्यांनी हिंदू संस्कार आणि संस्कृती परंपरेनुसार देहू गावचे कुल दैवत शिव मल्हार, कालभैरवाची मनोभावे तळी भरुन वृक्षारोपणास सुरुवात केली. एकुणच 121 देशी वड, पिंपळ, कडू लिंबाची झाडे लावली.

देहू गावातील मल्हार गडावर मागील 9 वर्षांपासून देशी झाडांचे वृक्षारोपण करुन आज मितीला नावा रुपाला आणण्याचे काम वृक्ष मित्र, निसर्ग प्रेमी सोमनाथ आबा मुसगुडे यांनी केले आहे. पुणे महामार्गावर मोठ्या प्रमाणात दुतर्फा असलेल्या झाडांची कत्तल करण्यात आली. त्या झाडांच्या फांद्या या डोंगरावर लावुन आज रोजी मोठ्या वृक्षात रुपांतर झाल्याचे येथे दिसते.

डोंगरावर आज मितीला एक लाख लिटर पाणी क्षमता असणारे तळे निर्माण करुन लावलेली झाडे 100 टक्के बहरली आहेत.

### प्लास्टिकमुक्त भारत... जनजागृती

» आपला परिवार सातत्याने मागील सहा वर्षांपासून समाजाभिमुख काम करत असून वर्षभरात मकरसंक्रांत, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण आणि एक हात मदतीचा हे उपक्रम मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. मागिल वर्षी आपल्या देशाचा अमृत महोत्सव साजरा करताना 15 ऑगस्ट 2022 रोजी पुर्ण पुणे शहरात एक तासात 10,000 कापडी पिशव्या मोफत वाटून "प्लास्टिक मुक्त भारत देश माझा" करण्यासाठी एक लाख लोकांपर्यंत जनजागृती करण्यात यश मिळाले असे संस्थेचे सेक्रेटरी अजित भालेराव यांनी सांगितले.

त्याच बरोबर शिव मल्हार सेवा समितीच्या वतीने गडावर कालभैरव मंदिर उभे करण्याचे काम चालू आहे.

आपल्या परिवारातील 108 कुंटूबीयानीं उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन सातत्याने तिसर्या वर्षी 121 देशी झाडांचे वृक्षारोपण करत तिर्थक्षेत्र देहू या आध्यात्मिक, निसर्ग रम्य परिसरात एक लाख झाडे वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाला देहू देवस्थान अध्यक्ष ह.भ.प.पुरुषोत्म महाराज मोरे, नगरसेवक मयूर शिवशरण, नगरसेविका पुजा दिवटे, दत्तात्रय जाधव अनेक निसर्ग प्रेमी संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आपला परिवार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एस.आर. शिंदे यांनी सोमनाथ आबा यांना त्यांच्या कामाचा गौरव करत शॉल व जास्वंदीचे रोप देऊन सत्कार केला.

या उपक्रमासाठी अनिल शर्मा, विजय शिर्के, यशवंत महाजन, अजित भालेराव, दिपक मराठे, वामनराव आवटी, किरण कांबळे, महंमदशरीफ मुलाणी, दत्तात्रय कुंभार यांनी पुढाकार घेतला.

# गिर्यारोहकांना शासनाने प्रोत्साहन द्यावे!

## » "सागरमाथा – गाथा एव्हरेस्टच्या विजयाची" चे प्रकाशन

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**एव्हरेस्टसारख्या शिखरावर चढाई करणे ही एक प्रकारची लढाईच आहे. कसलेल्या गिर्यारोहकांची जन्म मरणाची ही कसोटी असते, त्यामध्ये यशस्वी झालेल्या गिर्यारोहकांचा केंद्र व राज्य सरकारने सन्मान करून त्यांना प्रोत्साहन द्यावे यासाठी आपण सरकार दरबारी पाठपुरावा करणार असल्याचे प्रतिपादन खासदार छत्रपती युवराज संभाजीराजे यांनी केले.**



खासदार छत्रपती युवराज संभाजीराजे यांच्या हस्ते चऱ्होली येथे रविवारी एव्हरेस्टवीर श्रीहरी अशोक तापकीर यांच्या "सागरमाथा – गाथा एव्हरेस्टच्या विजयाची" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ गिर्यारोहक ऋषीकेश यादव, महाराष्ट्रातील पहिले एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण, ज्ञान आशा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. अमित आंद्रे, ज्ञानेश्वर तापकीर, माजी महापौर नितिन काळजे, साहित्यिक व कामगार नेते अरूण बोऱ्हाडे आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी सागरमाथा गिर्यारोहण संस्थेचे आणि ज्ञान आशा फाउंडेशनच्या संकेतस्थळांचे खा. संभाजीराजे यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. श्रीहरी तापकीर, नितीन काळजे, ज्ञानेश्वर तापकीर, अमित आंद्रे यांनीही मनोगत व्यक्त केले.

### तापकीर माता-पित्यांचा सन्मान...

» सागरमाथा गिर्यारोहण संस्था आणि ज्ञान – आशा फाउंडेशन या संस्थांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामवंत एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण, शरद कुलकर्णी, किशोर धनकुडे, भगवान चवले, लहू उघडे आणि सुविधा कडलग या गिर्यारोहकांचा सन्मान करण्यात आला. तसेच दिवंगत गिर्यारोहक रमेश गुळवे आणि श्रीहरी तापकीर यांच्या माता पित्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

### श्रीहरी तापकीर यांचा गौरव...

» यावेळी बोलताना महाराष्ट्रातील पहिले गिर्यारोहक सुरेंद्र चव्हाण यांनी श्रीहरी चे कौतुक करताना सामान्य शेतकरी कुटुंबातील हा युवक जिद्द, चिकाटी आणि प्रखर आत्मविश्वास याच्या बळावर जगातील सर्वोच्च शिखरावर चढाई करून थांबला नाही, तर आपल्या अनुभवाची शिदोरी नवीन गिर्यारोहकांना देत राहिला, असे गौरवउद्गार काढले. यावेळी अध्यक्ष हृषिकेश यादव यांनी श्रीहरी तापकीर यांच्या पुस्तकातून प्रत्येक युवकाला जीवनातील कठीण प्रसंगाला धैर्याने सामोरे जाण्याचे मानसिक बळ मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमास गिर्यारोहण क्षेत्रातील मान्यवरांसह ज्ञानेश्वर मोळक, बी.आर. मेहता, बाळासाहेब पाटील, विनायक खोत, निलेश गावडे, ब. हि. चिंचवडे, यश मस्करे, विलास मडेगिरी, विनया तापकीर, सुवर्णा बुर्डे, सचिन तापकीर, कुणाल तापकीर, संदीप तापकीर, सागरमाथा संस्थेचे अध्यक्ष प्रवीण हरपळे, सुमित दाभाडे, पांडुरंग शिंदे आदी उपस्थित होते.




# ‘झट् मागवलं, पट् खाल्लं’



त्या रेडीमेड, झटपट जेवणांचे आमच्यासारख्यांवर फार मोठे उपकार आहेत,” ऋता तावातावाने म्हणाली. ऋता एका बडय़ा फायनान्शियल फर्ममध्ये उच्चपदाची जबाबदारी सांभाळते. खरोखरच दिवसाला ‘३६ तास काम’ असतं. जेवण्यानिजण्याला वेळ नसतोच. ‘झट् मागवलं, पट् खाल्लं,’ हे तिला सोयीचं वाटतं. औद्योगिक क्रांतीनंतर, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर कारखान्यांच्या बाहेर, कणकेच्या पात्यांत गुंडाळून तळलेल्या मसालेदार मांसखंडांची विक्री सुरू झाली. तळणीच्या घमघमाटाने कामगारांची भूक खवळली. सगळय़ा जगाचा बकासुरी घास करणाऱ्या श्रीमंत ‘शीघ्र-अन्न’ व्यवसायाचा श्रीगणेशा झाला. औद्योगिकीकरणाच्या आधी तशी ‘शीघ्रान्नं (फास्ट फूड)’ नव्हतीच असं नाही. पुरातन रोम शहराच्या मध्यभागी राहणाऱ्या लोकांकडे स्वयंपाकघरं नव्हतीच. ते रस्त्यांवरच्या टपऱ्यांतून भाज्या आणि मद्यात मुरलेली भाकरी घेऊन खात. जगातल्या बहुतेक मध्ययुगीन शहरांत प्रवाशांसाठी आणि बेघरांसाठी चटपटीत शीघ्रान्नाचे ठेले रात्रंदिवस चालू असत. आपल्या जत्रांमध्ये, आठवडीबाजारांत भजी, शेवांची चाकं, लाडू विकणारे ठेले होतेच.

२००८ साली मिनेसोटा विद्यापीठाने तशा नियमितपणे ‘फास्ट फूड’ खाणाऱ्या शेकडो लोकांचं सर्वेक्षण केलं. ९२ टक्के लोकांना कामाच्या भाऊगर्दीत, ‘आठवण आल्याबरोबर ऑर्डर करून लागलीच समोर हाजीर होणारं,’ अन्न पाहिजे असतं. ८० टक्के लोक ते कामाजवळच्या, सोयीच्या दुकानात मिळतं म्हणून घेतात. ६९ टक्के लोकांना त्याचा स्वाद आवडतो. १२ टक्के लोकांना मित्रांशी गप्पा मारत जेवताना तसा रुचकर, वेगवान खाऊ हवासा वाटतो. आपल्याकडे कामगारांना, विद्यार्थ्यांना, प्रवाशांनाही वडापाव हे सोयीचं अन्नब्रह्म आहे. इतकं मनाजोगं, सोयीस्कर अन्न वाईट का म्हणायचं? अलीकडे मिळणाऱ्या बऱ्याच शीघ्रान्नांत अन्नरक्षक (प्रिझर्व्हेटिव्ह), तेलपाण्याचं मीलन घडवून आणणारे इमल्सिफायर्स मिसळतात. तळणं, धुरी देणं, गोठवणं, गरम करणं वगैरे अनेक संस्कार (प्रोसेस) त्यांच्यावर होतात. तशा बहुसंस्कृतपणाचे तोटे तपासायला लंडनच्या किंग्ज कॉलेजने एक छोटासा प्रयोग केला. एमी या २४ वर्षांच्या मुलीला पंधरवडाभर फक्त बहुसंस्कृत (हायली प्रोसेस्ड) आहारच दिला. तिच्या जुळय़ा बहिणीला, नॅन्सीला मात्र मोजून तेवढंच पोषण देणारा, माफक शिजवलेला आहार दिला. एमीचं वजन एका किलोने वाढलं. तिचा रक्तदाब आणि रक्तातली साखरही वाढली. नॅन्सीचं वजन घटलं. मग रोजच तसाच आहार घेतल्यावर काय होईल? त्याचाही अनेक ठिकाणी अभ्यास झाला आहे. अशा खाऊंच्या गोड-अगोड बहुतेक अवतारांत प्रकट-अप्रकट रूपांत चांगलीच साखर असते. प्राचीन सस्तन प्राण्यांपासून आपल्यापर्यंत सगळय़ांच्या मेंदूला गोड चव हा पौष्टिक अन्नाचा परवलीचा संकेत वाटतो. मेंदूच्या बुडाचं आनंदकेंद्र, गाभ्यातलं स्मृतिकेंद्र गोडीवर भाळतात. शिवाय त्या पदार्थातल्या टोमॅटो, चीझ, अजिनोमोटो वगैरेंत ‘उमामी’ ही सातवी, अतिसुखद चव असते. त्या दोघींसाठी मेंदू आसुसतो. व्यसन लागतं. एकदा तशी चटक लागली की घरी स्वयंपाक करायचा कशासाठी? तो शिकायचा तरी कशाला? ते शिक्षण, ती कलाजीवनातून बादच होतात. शिवाय व्यावसायिक निर्माते बर्गर-चिकन नगेट्ससारखे मुख्य पदार्थ मुद्दाम स्वस्त ठेवतात. मेंदूतली विचारी केंद्रंही त्या स्वस्ताईला फसतात. सोबतच्या बटाटय़ांची, शीतपेयांची लावलेली भरमसाट किंमत त्या भुललेल्या केंद्रांना जाणवतही नाही. व्यावसायिक निर्माते शीघ्रान्नाच्या वेष्टनाला आपल्या ब्रॅण्ड-चिन्हांनी सजवतात. हवं तेव्हा हजर होणाऱ्या रुचकर अन्नाचं ते प्रतीक होतं. शहराच्या मुख्य रस्त्यांवर ठायीठायी शीघ्रान्नाच्या दुकानांवर तशी ब्रँडचिन्हं ठळकपणे झळकत असतात. ती दिसली की प्रतिक्षिप्त क्रियेने त्याच अन्नाची ओढ लागते. ते पटकन मिळायची शाश्वतीच असल्यामुळे धीर धरायची गरजच नसते. तात्काळ मागवलं, मिळालं, खाल्लं की शीघ्रान्नाचं मानसिक दुष्टचक्र सुरू होतं.

**“म्हणे घरी करून खा! रिकामटेकडय़ांना सांगायला काय जातं? सकाळपासून नुसती धुमश्चक्री असते! सीरियल-दूध नाहीतर कॉफी-बिस्कीट जेमतेम खाऊन ट्रेन गाठायची. दुपारी कामं करता करताच हॅम्बर्गर-कॉफी पोटात ढकलायची. रात्री घरी पोचेतो इतकं थकायला होतं! एखादं कॉम्बो-मील घरी मागवतो. नाहीतर नूडल्स किंवा रेडीमेड सूप-ब्रेड ढोसलं की झोपायला मोकळे!**

## संपादकीय »

# दिलासा पुरे; कारवाई करा


***मणिपूरमध्ये चालू असलेल्या हिंसाचार आणि जातीजमातींमधील विद्वेषामुळे जबरदस्त हादरा बसला आहे. आता यासंदर्भात दिलासा नव्हे, तर कारवाई करा अशी संपूर्ण भारतात नागरिकांकडून मागणी होत आहे....***

ईशान्य भारताचे भौगोलिक स्थान आणि दुर्गमता, तिथले विविध राज्यांतर्गत जातिसमूह, त्यांच्यातले सुप्त-उघड संघर्ष, इथल्या जाती-जमाती-वंश यांच्या अस्मिता, या राज्यांच्या अनेक देशांना लागून असणाऱ्या सीमा, गेले अनेक दशके तेथे चाललेल्या फुटीर सशस्त्र चळवळी, जगातल्या अनेक ‘भारतप्रेमी’ संस्थांचे ईशान्य भारताकडे असणारे लक्ष, तेथे शंभराहून अधिक वर्षे चाललेले धर्मांतरांचे उद्योग या साऱ्यांमधून कमालीची गुंतागुंतीची स्थिती निर्माण झाली आहे. ही गुंतागुंत हलक्या हाताने, संवेदनशीलतेने हाताळण्याऐवजी आपापल्या सोयीच्या राजकारणासाठी ईशान्येचे प्यादे करण्याचा मोह राजकीय पक्षांना कधीही आवरलेला नाही. त्यातून छोटे-मोठे संघर्ष अधिकच चिघळत गेले आहेत.

**आपल्या राज्यघटनेत राज्यासंबंधीच्या धोरणांबाबत मार्गदर्शक तत्त्वे सांगणारे एक पूर्ण प्रकरण आहे. ४४ वा अनुच्छेद हा चौथ्या प्रकरणात दिलेल्या १८ अनुच्छेदांपैकी एक आहे. आपल्या राज्यघटनेत राज्यासंबंधीच्या धोरणांबाबत मार्गदर्शक तत्त्वे सांगणारे एक पूर्ण प्रकरण आहे. ४४ वा अनुच्छेद हा चौथ्या प्रकरणात दिलेल्या १८ अनुच्छेदांपैकी एक आहे.**

# एकसमान म्हणजे समान नाही..

समानता आणण्याच्या आणि भेदभाव दूर करण्याच्या संदर्भात अनुच्छेद ३८(२) मध्ये नमूद केलेले निर्देश उत्पन्नातील दरी कमी करणे, दर्जातील असमानता दूर करणे, सुविधा आणि संधींमधील असमानता दूर करणे या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. अनुच्छेद ३९ मध्ये नमूद केलेले निर्देश सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या दृष्टिकोनातून या प्रकरणाच्या मध्यवर्ती आहेत. लाखो कष्टकरी लोकांच्या आकांक्षा ज्यात आहेत, ते अनुच्छेद ४३ ‘उदरनिर्वाहाच्या साधना’ची हमी देण्याचे निर्देश देते. दुर्दैवाने, या निर्देशात्मक तत्त्वांवर क्वचितच चर्चा होते. हे निर्देश सरकारच्या अजेंडय़ावर नाहीत. सर्वोच्च न्यायालयाच्या काही निरीक्षणांमुळे आणि संघ-भाजपच्या अजेंडय़ामुळे एकटय़ा अनुच्छेद ४४ नेच सगळा राजकीय अवकाश व्यापला आहे. अनुच्छेद ४४ ची भाषा पाहा: “देशाच्या संपूर्ण भूभागात नागरिकांसाठी समान नागरी संहिता सुरक्षित करण्याचा



सरकार प्रयत्न करेल.” शब्दांना अर्थ असतो. हम्प्टी डम्प्टीने ॲलिसला दिलेल्या उत्तराप्रमाणे, शब्दाचा अर्थ ‘मी कोणता अर्थ निवडतो’ त्याप्रमाणे नसतो. ‘एकसमान’ (‘युनिफॉर्म’) म्हणजे ‘समान’ (‘कॉमन) नाही. सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे ‘सुरक्षित ठेवणे’ नाही. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे सहकारी अज्ञ नव्हते. त्यांना इतिहास, धर्म, जातिभेद, सामाजिक आणि कौटुंबिक व्यवस्था, भारतीय लोकांच्या सांस्कृतिक चालीरीती आणि परंपरांचे सखोल ज्ञान आणि आकलन होते. त्यांनी चौथ्या प्रकरणातील शब्द काळजीपूर्वक निवडले आहेत. एकसमान नागरी संहिता (UCC) हे वैयक्तिक कायद्यांचे लघुलेखन आहे. ते विवाह आणि घटस्फोट, उत्तराधिकार आणि वारसा, अल्पसंख्याक आणि पालकत्व आणि दत्तक घेणे आणि देखभाल या चार क्षेत्रांमधील कायद्यांशी संबंधित आहे. या देशाच्या विविध भागांत राहणाऱ्या, विविध स्तरांतील लोकांचे वैयक्तिक कायदे शतकानुशतके वेगवेगळय़ा पद्धतीने विकसित होत गेले आहेत. ज्यांनी ज्यांनी इथे राज्य केले त्या सगळय़ांनी या पद्धती विकसित होण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यात धर्माची भूमिका महत्त्वाची आहे. भूगोल, प्रजननक्षमता, विजय, स्थलांतर आणि परदेशी प्रभाव यांचाही वैयक्तिक कायद्यांवर परिणाम झाला आहे. आज अस्तित्वात असलेल्या वैयक्तिक कायद्यांमध्ये लैंगिक भेदभाव आहेच, तसेच पार-लिंग आधारित भेदभाव आहे. या कायद्यांमध्ये अवैज्ञानिक आणि चुकीच्या प्रथा आहेत. काही सामाजिक कुप्रथा आणि परंपरा आहेत. वैयक्तिक कायद्यांच्या या पैलूंमध्ये सुधारणा करणे नि:संशयपणे आवश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



विसरले कुळ आपुला आचार ।
पती भावे दीर घर सोय ॥१॥

सांडिला लौकिक लाज भय चिंता ।
रातलें अनंता चित्त माझें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पूरग्रस्तांना 10 हजार रुपये!

## » दुकानाचे नुकसान झाल्यास 50 हजार रुपयांची मदत

| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत गत काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यात शेतकऱ्यांसह अनेकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी विधिमंडळात पूरग्रस्तांना दिलासा देण्यासाठी काही तातडीच्या घोषणा केल्या.**



त्यानुसार, सरकारने पूरग्रस्तांना 10 हजार रुपयांची तातडीची मदत करण्याचा निर्णय घेतला. मागील 8 दिवसांपासून राज्याच्या काही भागांत मुसळधार पाऊस सुरू आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेकजण पुरात वाहूनही गेलेत. विशेषतः अनेक गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्यामुळे घरांचीही मोठी पडझड झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सोमवारी विधान परिषदेत काही तातडीच्या घोषणा केल्या आहेत. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पूरग्रस्तांना सरकार 10 हजार रुपयांची तातडीची मदत करणार आहे. यात पुरामुळे दुकानांचे नुकसान झाल्यास 50 हजार रुपयांची मदत केली जाईल.

तसेच पुरात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांना प्रत्येकी 4 लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली जाईल. 19 जुलै रोजी राज्याच्या विविध जिल्ह्यांत अतिवृष्टी झाली. यवतमाळ, बुलडाणा, वाशिम या जिल्ह्यांमध्ये प्रचंड पाऊस पडला. यवतमाळमध्ये 110 नागरिकांना एनडीआरएफने सुरक्षित स्थळी हलवले. याकामी हेलिकॉप्टरचीही मदत घेण्यात आली, असे अजित पवार यांनी विधान परिषदेत बोलताना सांगितले. बुलडाणा जिल्ह्यात 102 मिलीमीटर पाऊस झाला. यामुळे तेथील नदी-नाल्यांना पूर आला होता. वाशिममध्ये 139.7 मिलीमीटर पाऊस झाला. सरकारने वेगवेगळ्या जिल्ह्यांत मदतकार्य करण्यासाठी काही पथके तैनात केली आहेत. या पावसात मृत पावलेल्यांच्या कुटुंबीयांना 4 लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. विशेषतः सरकारने तातडीने पिकांचे पंचनामे करण्याचेही निर्देश दिलेत. घरात पुराचे पाणी शिरून झालेल्या नुकसानीसाठी 5 ऐवजी 10 हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान मदत देण्याचे निर्देश देण्यात आलेत, असे अजित पवार यांनी सभागृहात सांगितले.

### स्वस्तात अन्नधान्याचे वाटप

- » पुरामुळे शेतजमीन खरडून गेली असेल, तर तिथे पंचनामे करुन पुन्हा त्या जमिनी पूर्ववत करण्यासाठी जो खर्च येईल त्यासाठी सरकार योग्य तो निर्णय घेणार आहे.
- » पीडित व्यक्तींना स्वस्त दरात अन्नधान्याचे वाटप केले जाईल. यासंबंधीचे योग्य ते निर्देश संबंधितांना देण्यात आल्याची माहितीही अजित पवार यांनी यावेळी दिली.

# शिंदे हेच मुख्यमंत्री राहतील

## » चुकीची वक्तव्ये ; फडणवीसांनी सुनावलं

| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**महायुतीमधील कोणीही मुख्यमंत्री बदलाबाबत चर्चा करु नये. महायुतीमधील जे लोक हा प्रकार करत आहेत, त्यांना माझं स्पष्ट सांगणं आहे की, अशाप्रकारचे संमिश्र संकेत देणे आणि संभ्रम निर्माण करणे बंद करा. यामुळे महायुतीबाबत संभ्रम निर्माण होतो.**



महायुतीतील नेत्यांच्या मनात अशी कुठलीही गोष्ट नाही. एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री आहेत आणि तेच मुख्यमंत्री राहतील, हे मी अधिकृतपणे सांगत आहे, अशा स्पष्ट शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमध्ये नव्याने सामील झालेल्या अजित पवार गटातील वाचाळ नेत्यांची कानउघडणी केली. गेल्या काही दिवसांपासून अजित पवार गटातील काही आमदार आणि मंत्री लवकरच अजित पवार मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील, अशी वक्तव्ये करत आहेत. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी संध्याकाळी विधिमंडळाच्या आवारात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री बदलाबाबतच्या सर्व चर्चांना विराम दिला.कुठल्याही पक्षातील लोकांना आपलाच नेता मुख्यमंत्री झाला पाहिजे, असे वाटणे साहजिक आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला वाटू शकतं, अजित पवार यांनी मुख्यमंत्री व्हावं. आमच्या लोकांना वाटू शकतं, भाजपचा नेता मुख्यमंत्री झाला पाहिजे.'

यामध्ये वावगं काहीही नाही. मात्र, मी पूर्ण अधिकृतपणे या महायुतीमधील सर्वात मोठा पक्षाचा नेता म्हणून सांगतो की, या महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच राहतील. दुसरा कोणीही मुख्यमंत्री होणार नाही. मुख्यमंत्री पदामध्ये कोणताही बदल होणार नाही. अजित पवार आणि माझ्या मनात याबाबत स्पष्टता आहे. महायुतीची चर्चा झाली तेव्हाच अजितदादांना कल्पना देण्यात आली होती आणि ती गोष्ट त्यांनी स्वीकारली आहे.

### शिंदे मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार?

» काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी आजच प्रसारमाध्यमांशी बोलताना, एकनाथ शिंदे यांना १० ऑगस्टपर्यंत मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार व्हावे लागेल, त्यानंतर अजित पवार मुख्यमंत्री होतील, असे भाकीत वर्तविले होते. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी चव्हाण यांचा हा दावा फेटाळून लावला. सध्या पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारखी पतंगबाजी अनेकजण करत आहेत. अनेक लोक राजकीय भविष्यवेत्ते झाले आहेत. पण त्यांनी कितीही भविष्य सांगून कितीही संभ्रम निर्माण केला तरी मी अतिशय स्पष्टपणे आणि पूर्ण अधिकृतपणे सांगतो की, १० तारखेला, ११ तारखेला किंवा ९ तारखेला काहीही होणार नाही. काही झालचं तर आमचा मंत्रिमंडळ विस्तार होईल.

# '40 खोक्यांवर डल्ला, वारकऱ्यांवर हल्ला'



| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी|

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील दुसऱ्या आठवड्यातील पहिल्याच दिवशी विरोधक चांगलेच आक्रमक झाले. विरोधी पक्षाच्या आमदारांनी विधानसभेच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. '40 खोक्यांवर डल्ला, वारकऱ्यांवर हल्ला', अशी घोषणाबाजी करत विरोधकांनी आंदोलन केले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस नेते भाई जगताप यांच्यासह ठाकरे गटाचे आमदार व काँग्रेसचे आमदार या आंदोलनात सहभागी झाले होते.

पंढरपूर येथे वारकऱ्यांवर झालेल्या लाठीचार्जचा विरोधकांनी निषेध केला. विरोधी पक्षाच्या आमदारांनी डोक्यावर टोपी आणि हातात टाळ घेत हे अनोखे आंदोलन केले. टाळ वाजवत विरोधी पक्षाच्या आमदारांनी सरकारच्या या कृतीचा निषेध व्यक्त केला. तसेच '40 खोक्यांवर डल्ला, वारकऱ्यांवर हल्ला' अशा घोषणा देखील विरोधी पक्षाच्या आमदारांनी दिल्या आहेत. कर्जत जामखेड एमआयडीसी प्रश्नी आमदार रोहित पवार यांनी सकाळीच विधिमंडात आंदोलन केले. विधिमंडळातील छत्रपती शिवजी महाराजांच्या पुतळ्याजवळ हातात फलक घेत त्यांनी एमआयडीसीच्या मागणीसाठी सरकारचा निषेध केला.

# 74 रोहिंग्या मुस्लिमांना अटक!

## » बांगलादेशातून अवैधरित्या सीमा ओलांडून भारतात

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यूपी एटीएसने रविवारी रात्री गाझियाबाद, मथुरेसह 6 जिल्ह्यांमध्ये छापे टाकून अवैधरित्या राहणाऱ्या 74 रोहिंग्या मुस्लिमांना अटक केली. अटक करण्यात आलेल्या रोहिंग्यांमध्ये महिला आणि लहान मुलांचाही समावेश आहे. हे सर्वजण बांगलादेशातून सीमा ओलांडून बेकायदेशीरपणे भारतात आले होते आणि येथील झोपडपट्टीत राहत होते.**



मथुरेतील ठाणे जैंत भागातील अल्हापूर आणि कोटा या गावांदरम्यान मोठ्या संख्येने रोहिंग्या झोपडपट्टीत राहत होते. एटीएसच्या पथकाने मथुरा पोलिसांशी हातमिळवणी केली. आग्रा-दिल्ली राष्ट्रीय महामार्गावरील अल्हापूर गावासमोरील झोपडपट्टीत पथक पोहोचले आणि तपास सुरू केला.

दुपारी दोनच्या सुमारास पोहोचलेल्या पथकाने प्रथम सर्वांचे पेपर तपासले. तब्बल 8 तास चाललेल्या या कारवाईत पथकाने घटनास्थळावरून 29 पुरुष आणि 2 महिलांना अटक केली. टीमने सर्वांना बसमध्ये बसवले. एसपी सिटी मार्तंड प्रकाश सिंह यांनी सांगितले की, 40 रोहिंग्यांना अटक करण्यात आली आहे.

मात्र, एटीएसने 31 जणांच्या अटकेला दुजोरा दिला आहे. हापूरच्या धौलाना येथे एटीएसने छापा टाकला. टीमने खिचरा गावाच्या आजूबाजूच्या वेगवेगळ्या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या सुमारे 16 रोहिंग्या मुस्लिमांना पकडले आहे. हापूर पोलिसांनी सांगितले- धौलाना पोलिस स्टेशन हद्दीतील खिचरा गावात पकडलेल्या रोहिंग्यांची चौकशी केली जात आहे. त्यांच्या कागदपत्रांची छाननी सुरू आहे. एटीएसनुसार 74 रोहिंग्यांना अटक करण्यात आली आहे. सहारनपूरमधून दोन, दोन पुरुष, एक अल्पवयीन आणि मेरठमधून एक महिला, 12 पुरुष, एक महिला, हापूरमधून 3 अल्पवयीन, 3 पुरुष, गाझियाबादमधून एक महिला, 7 पुरुष, अलिगढमधून 10 महिला, मथुरा येथून 29 पुरुष आणि दोन महिलांना अटक करण्यात आली आहे.

### रोहिंग्या मुस्लिम कोण आहेत?

» रोहिंग्या हे राज्यविहीन वांशिक गट आहे. ते इस्लामचे पालन करतात आणि म्यानमारच्या राखीन राज्यातून आले आहेत. 1982 मध्ये बौद्ध बहुल देश म्यानमारने रोहिंग्यांचे नागरिकत्व काढून घेतले होते. त्यामुळे शिक्षण, सरकारी नोकरी यासह अनेक हक्कांपासून ते दुरावले. तेव्हापासून म्यानमारमध्ये रोहिंग्यांविरुद्ध हिंसाचार सुरूच आहे. 2017 मध्ये रोहिंग्यांच्या नरसंहारापूर्वी म्यानमारमध्ये त्यांची लोकसंख्या सुमारे 1.4 दशलक्ष होती. 2015 पासून, 900,000 हून अधिक रोहिंग्या निर्वासित म्यानमारमधून बांगलादेश आणि भारतासह शेजारच्या देशांमध्ये पळून गेले आहेत. एकट्या बांगलादेशात रोहिंग्यांची संख्या 13 लाखांहून अधिक आहे.

---

# 'ज्ञानवापी'च्या सर्वेक्षणावर स्थगिती

## » याचिकाकर्त्यांना दिला दोन दिवसांचा वेळ!

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असणाऱ्या ज्ञानवापी मशीद सर्वोक्षण प्रकरणात आज सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. मशिदीचं शास्त्रीय पद्धतीने सर्वेक्षण करण्याचे आदेश वाराणसी जिल्हा सत्र न्यायालयाने दिले होते. यानंतर आज सकाळीच एएसआयच्या ३० सदस्यांचं पथक ज्ञानवापी मशिदीमध्ये सर्वेक्षणासाठी दाखल झालं होतं.**



सकाळपासूनच सर्वेक्षणाच्या प्रक्रियेला सुरुवातही करण्यात आली होती. मात्र, त्याचवेळी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान या सर्वेक्षणाला स्थगिती देण्याचा निर्णय न्यायालयाने दिला आहे. आज सकाळी एकीकडे एएसआयचं पथक ज्ञानवापी मशिदीत सर्वेक्षणासाठी दाखल झाली असताना दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयात या सर्वेक्षणाविरोधात मुस्लीम पक्षकारांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी नियोजित होती. ही सुनावणी सुरू झाली असता सर्वोच्च न्यायालयाने सर्व प्रकरणाचा आढावा घेतल्यानंतर सर्वेक्षणावर तातडीने स्थगिती आणण्याची मागणी केली. २६ जुलै २०२३ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ही स्थगिती लागू असेल, असं न्यायालयाने आपल्या आदेशांमध्ये नमूद केलं आहे. शुक्रवारी वाराणसी जिल्हा सत्र न्यायालयाने ज्ञानवापी मशिदीच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले होते. यामध्ये ग्राऊंड पेनिट्रेशन रडार सिस्टीमचा वापर करण्याचे निर्देश जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायमूर्ती अजय कृष्ण विश्वेश यांनी दिले होते. मात्र, हे सर्वेक्षण फक्त तीन घुमटांच्या खालीच केलं जावं, वझुखानाचं सर्वेक्षण केलं जाऊ नये, असंही न्यायमूर्तींनी नमूद केलं होतं.

### मशीद व्यवस्थापन उच्च न्यायालयात जाणार

दरम्यान, सर्वेक्षणाच्या निर्णयाविरोधात याचिका करणाऱ्या मशीद व्यवस्थापन समितीला या प्रकरणी उच्च न्यायालयासमोर दाद मागण्यास अवधी मिळावा, यासाठी ही स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने आणली आहे. दरम्यान, यासाठी आम्ही तयार असून उच्च न्यायालयात जाऊन तिथेही आम्ही त्यांच्या मागणीला विरोध करू, अशी भूमिका हिंदू पक्षकारांचे वकील विष्णू शंकर यांनी मांडली आहे. ज्ञानवापीचं सत्य सर्वेक्षण केल्याशिवाय बाहेर येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या टिप्पणी लक्षात न घेता उच्च न्यायालय स्वतंत्रपणे या याचिकांवर सुनावणी घेईल, अशी माहितीही विष्णू शंकर यांनी दिली.

# विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी नॅपकिन

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना मोफत सॅनिटरी नॅपकिन देण्याच्या प्रकरणावर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. ज्या राज्यांनी मोफत सॅनिटरी नॅपकिन्स देण्यासाठी एकसमान राष्ट्रीय धोरण तयार करण्याबाबत केंद्राकडे अद्याप उत्तर सादर केले नाही, त्यांना न्यायालयाने ताकीद दिली. 31 ऑगस्टपर्यंत उत्तर न दिल्यास कठोर व्हावे लागेल, असे न्यायालयाने सांगितले. यापूर्वी, केंद्र सरकारने न्यायालयाला सांगितले की, आतापर्यंत केवळ 4 राज्यांनी उत्तरे पाठवली आहेत. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. 10 एप्रिल रोजी शेवटची सुनावणी झाली. त्यात न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना एकसमान धोरण तयार करून 4 आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. यासोबतच शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहांची उपलब्धता, सॅनिटरी पॅडचा पुरवठा याबाबतही माहिती मागविण्यात आली. याशिवाय सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीनसाठी झालेल्या खर्चाचा तपशीलही देण्यास सांगण्यात आले. सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून मुलींच्या आरोग्य सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली होती.

याचिकेत म्हटले आहे की मासिक पाळीच्या समस्येमुळे अनेक मुली शाळा सोडतात, कारण त्यांच्या कुटुंबाकडे पॅडवर खर्च करण्यासाठी पैसे नसतात आणि त्या दिवसात कापड वापरून शाळेत जाणे त्रासाचे कारण बनते. शाळांमध्येही मुलींसाठी मोफत पॅडची सुविधा नाही. त्याचा परिणाम त्यांच्या अभ्यासावर होत आहे. एवढेच नाही तर वापरलेल्या पॅडची शाळांमध्ये विल्हेवाट लावण्याची सोय नसल्याने मुलींना मासिक पाळी दरम्यान शाळेत जाता येत नाही.


# रोहितची मुलाखत



बॉलीवूडमधील आघाडीचा प्रसिद्ध दिग्दर्शक आणि निर्माता म्हणजे रोहित शेट्टी; परंतु एक दिग्दर्शक किंवा निर्माता म्हणूनच नाही तर ‘खतरों के खिलाडी’ या रिॲलिटी शोचा सूत्रसंचालक म्हणूनही रोहितने कायमच प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळवले आहे. या शोमधील स्पर्धकाची दमदार स्टंटबाजी कायम प्रेक्षकांना थक्क करणारी असते. नुकतेच या कार्यक्रमाचे १३ वे पर्व कलर्स हिंदी वाहिनीवर सुरू झाले आहे. त्यासंबंधी रोहितशी केलेली ही खास बातचीत... खरं तर ‘खतरों के खिलाडी’ या कार्यक्रमाच्या प्रत्येका नव्या पर्वातून आम्ही कायमच प्रेक्षकांसाठी बऱ्याच नवीन गोष्टी आणत असतो.

त्यामुळे साहजिकच या पर्वातही खूप काही नवीन गोष्टी आहेत आणि यापुढेही पाहायला मिळतील, हे मी नक्कीच सांगेन. हे पर्व आतापर्यंतच्या पर्वांमधील सर्वात मोठे पर्व असणार आहे. ५० दिवसांपेक्षा जास्त आम्ही याचे चित्रीकरण करत होतो आणि करायलच हवे, कारण दरवर्षी प्रेक्षकांचे खूप प्रेम या कार्यक्रमाला मिळते. हा एक लोकप्रिय असा रिॲलिटी शो आहे. प्रेक्षकांचे भरभरून प्रोत्साहन आम्हाला मिळते, याचा आनंद आहे. पुन्हा एकदा नवीन खेळाडूंबरोबर या आधी कधीही न पाहिलेल्या नवीन स्टंटस् प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत. -अर्थात ते कठीण आहे, पण प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठी फक्त माझाच नाही तर संपूर्ण टीमचा खूप मोलाचा वाटा आहे. विशेषतः अशा ॲक्शनवर आधारित शोमध्ये प्रत्येक पर्वात काहीतरी नवीन प्रेक्षकांसाठी घेऊन येणे हे नक्कीच सोपे काम नाही. ते खूप आव्हानात्मक असते, पण आमची संपूर्ण टीम जवळजवळ ६-७ महिने खूप मनापासून यासाठी काम करत असते आणि आपल्या टीमची साथ लाभणे खरंच खूप महत्त्वाचे असते. आम्ही सर्वच एकजुटीने काम करतो. त्यामुळे नवनवीन कल्पना समोर येतात. प्रत्येक पर्वातून प्रेक्षकांना खूप अपेक्षा असतात आणि प्रेक्षकांच्या जबाबदारीची आम्हालाही जाणीव असते. कदाचित यामुळेच प्रेक्षक आजवर या कार्यक्रमाशी जोडून आहेत आणि हेच या शोच्या यशामागचे कारण आहे.

# कार्तिक आर्यनचा गौरव!



प्यार का पंचनामापासून कार्तिक आर्यनची झालेली सुरुवात आता त्याला यशाच्या शिखरावर घेऊन गेली आहे. तो एक तारांकित अभिनेता झाला आहे. त्याच्या शब्दाला वजन आले आहे. प्रख्यात सेलिब्रेटी झाला आहे. सोशल मीडियावर त्याचा मोठा चाहतावर्ग आहे. त्याला फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. अशा कार्तिकच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. काही दिवसांपूर्वी कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणी यांचा सत्य प्रेम की कथा नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. समीर विद्वंस दिग्दर्शित या चित्रपटानं चांगली कमाई केली आहे. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसादही मिळाला आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटानं शंभर कोटींपेक्षा जास्त कमाई केल्याची आकडेवारी समोर आली आहे. यानंतर येत्या काळात कार्तिकचे मोठे प्रोजेक्ट चाहत्यांचे लक्ष वेधून घेणार आहे. कार्तिकनं गेल्या वर्षांपासून त्याचा फॉरमॅट चेंज केल्याचे दिसून येत आहे. तो आता विनोदी आणि हलक्या फुलक्या विषयांवरील चित्रपटांकडे जास्त लक्ष केंद्रित करत असल्याचे दिसून आले आहे. कार्तिकच्या चित्रपटांचा चाहतावर्ग वेगळा आहे. त्यामुळे नव्या विषयाच्या चित्रपटांना प्रेक्षकांसमोर घेऊन येणाऱ्या कार्तिकच्या कलाकृतींना मोठी दाद मिळताना दिसते. आता कार्तिकच्या चाहत्यांसाठी एक गोड बातमी आहे. ती म्हणजे कार्तिकचा जागतिक पातळीवर होणारा गौरव. फिल्म इंडस्ट्रीमध्ये त्यानं दिलेल्या महत्वपूर्ण योगदानासाठी त्याला मेलबर्नमधील इंडियन फिल्म फेस्टिव्हल मध्ये गौरविण्यात येणार आहे. आयएफएफएम कडून हा गौरव होणार असल्याची माहिती सुत्रांकडून देण्यात आली आहे. बॉलीवूडमधील सध्याच्या घडीला लिस्ट ए मधील कलाकारांमध्ये कार्तिक आर्यनचे नाव घेतले जाते. कार्तिकला आता रायझिंग ग्लोबल सुपरायझर स्टार ऑफ इंडियन सिनेमा या पुरस्कारानं गौरविण्यात येणार आहे. व्हिक्टोरिया सरकारकडून पुढील महिन्यात अकरा तारखेला या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. बॉलीवूडपटांचे प्रसिद्ध समीक्षक तरण आदर्श यांनी ट्विटद्वारे ही गोड बातमी चाहत्यांना दिली आहे. त्या पोस्टला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळतो आहे.

# तमन्नाकडे सर्वात मोठा हिरा!



साऊथमध्ये आपल्या अभिनयाची छाप सोडल्यानंतर तमन्ना भाटियाने आता बॉलिवूडकडे तिचा मोर्चा वळवला. खुप कमी वेळात ती बॉलिवूडमधलं ही एक प्रसिद्ध नाव बनली आहे. गेल्या काही दिवसांपासून तमन्नाची खुपच चर्चा आहे. नुकतीच तमन्ना 'जी कारदा' आणि 'लस्ट स्टोरीज 2' या वेब सीरिजमध्ये दिसली होती. या दोन्ही वेबसिरिजमधील तिच्या बोल्ड सीनची बरीच चर्चा झाली होती. तमन्ना तिच्या उत्तम अभिनयासोबतच सौंदर्य आणि वेगवेगळ्या भुमिकांसाठीही ओळखली जाते. तमन्नाची फॅशन आणि स्टाईल लोकांना खूप आकर्षित करते. यासोबतच तिला हिऱ्यांच्या दागिन्यांची खूप आवड आहे. तिच्याकडे सर्वात महागडे दागिने असून त्यात एक हिरा असा आहे जो जगातील पाचव्या क्रमांकाचा हिरा असल्याचं बोलल जात आहे. मीडिया रिपोर्ट्समध्ये दिलेल्या माहितीनुसार, तमन्ना भाटियाकडे जगातील पाचव्या क्रमांकाची डायमंड असलेली भली मोठी अंगठी आहे. ज्यामध्ये एक मोठा हिरा जडलेला आहे. या हिऱ्याची किंमत 2 कोटी रुपये असल्याचा दावा करण्यात आला आहे. या अंगठीतील हिऱ्याचा आकार अतिशय सुंदर आहे जो खुपच चमकदार आणि सुंदर कलाकृतीचा आहे. एका अहवालानुसार, तमन्नाला ही हिऱ्याची अंगठी 2019 मध्ये दक्षिण सुपरस्टार राम चरणची पत्नी उपासना कामिनेनी भेट दिली होती. SYE RAA NARASIMHA REDDY या चित्रपटातील तमन्नाच्या उत्कृष्ट अभिनयाने प्रभावित होऊन उपासनाने तिला ही हिऱ्यांची अंगठी भेट दिली. उपासनाने तिच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तमन्ना भाटियाचा हिऱ्याची अंगठी असलेला फोटो शेअर केला आहे. त्या पोस्टमध्ये तमन्नाने धन्यवाद म्हटले आहे. ती विजय वर्माला डेट करत असल्याच तिने सांगितलं आहे. तमन्ना भाटियाचा विजय वर्मासोबतचा लस्ट स्टोरीज 2 नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. त्याचबरोबर तिचा चिरंजीवीसोबतचा 'भोला शंकर' हा चित्रपट ऑगस्टमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# मौत का सौदागर

बॉलीवूडचा किंग खान हा त्याच्या जवान नावाच्या चित्रपटामुळे चर्चेत आला आहे. काही दिवसांपूर्वी जवानचा टीझर व्हायरल झाला होता. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. पठाणला बॉक्स ऑफिसवर मिळालेलं यश जवानच्या वेळेस कायम राहणार का याची चाहत्यांना कमालीची उत्सुकता आहे. जवानमध्ये खलनायकाच्या भूमिकेत असलेल्या विजय सेतूपतीची चर्चा होत आहे. त्याचा लूक आता नेटकऱ्यांच्या भेटीला आला आहे. यापूर्वी विजयनं बॉलीवूडमधील काही चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. नुकतीच त्याची फर्जी नावाची वेबसीरिज येऊन गेली. त्याला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला होता. 'जवान'च्या नवीन पोस्टरच्या वाढत्या अपेक्षेदरम्यान, चित्रपटाचा मुख्य अभिनेता शाहरुख खानने खलनायकाची झलक सादर केली आहे. जावानच्या एका जबरदस्त नवीन पोस्टरमध्ये, बॉलीवूड सुपरस्टार शाहरुख खानने विजय सेतुपतीची ओळख 'मौत के सौदागर' म्हणून केली.

# पाकिस्तानचा खोटारडेपणा

## » फसवून जिंकला कप; फायनल मॅचमध्ये चक्क 6 खेळाडू

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**एमर्जिंग आशिया कप २०२३च्या फायनलमध्ये भारताचा पराभव करून पाकिस्तानने विजेतेपद पटकावले. या विजेतेपदानंतर पाकिस्तान हवेत आहे. मात्र याच स्पर्धेतील साखळी फेरीच्या लढतीत भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला होता. पाकिस्तानने मिळवलेल्या विजयानंतर त्यांनी केलेली फसवणूक समोर आली आहे.**



या स्पर्धेतील संघ हे २३ वर्षाखालील होते. पाकिस्तानच्या संघात असे ६ खेळाडू होते ज्याचे वय २३ वषपिक्षा अधिक होते. इतक नाही तर त्यांच्याकडे आंतरराष्ट्रीय मॅच खेळण्याचा अनुभव होता. श्रीलंकेत झालेल्या एमर्जिंक आशिया कपला ज्युनिअर आशिया कप देखील म्हटले जाते. या स्पर्धेत २३ वर्ष किंवा त्या खालील खेळाडू भाग घेतात. बीसीसीआयने प्रामाणिकपणे संघ निवडला होता, ज्यात सर्व खेळाडू २३ वर्षाखालील होते. दुसऱ्या बाजूला पाकिस्तान आणि बांगलादेशने संघात असे खेळाडू घेतले होते ज्यांचे वय ३० वर्ष होते.इतक नाही तर या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचा अनुभव देखील होता.

भारताचा संघाने मात्र ज्युनिअर स्पर्धेत भाग घेतला होता. भारताविरुद्धच्या फायनल मॅचमध्ये ७१ चेंडूत १०८ धावांची खेळी करणाऱ्या तैयब ताहिर हा सर्वात वयस्कर खेळाडू होता. २६ जुलै रोजी तो ३० वर्षाचा होणार आहे. त्याने पाकिस्तानकडून ३ आंतरराष्ट्रीय टी-२० मॅच खेळल्या आहेत. पाकिस्तान संघात मोहम्मद वसीम हा सर्वात ज्युनिअर खेळाडू होता. त्याचे वय २१ आहे पण वसीमने पाकिस्तानकडून २ कसोटी, १४ वनडे आणि २७ टी-२० मॅच खेळल्या आहेत. इतका अनुभव असताना देखील तो ज्युनिअर आशिया कपमध्ये खेळत होता.

फक्त वसीमच नाही तर शाहनवाज दहानीने देखील पाककडून २ वनडे आणि ११ टी-२० मॅच खेळल्या आहेत. वयाचा विचार करायचा झाला तर दहानी २४ वर्षांचा आहे. ओमिर बिन युसूफ हा देखील २४ वर्षाचा खेळाडू आहे.

### 23 वर्षापेक्षा अधिक वयाचे खेळाडू

राष्ट्रीय संघाकडून एक वनडे मॅच खेळणारा कमरान गुलाम याचे वय देखील २७ वर्ष आहे. जलद गोलंदाज अमाद बट्टचे वय २८ असून त्याने आंतरराष्ट्रीय मॅच खेळली आहे. तसेच अरसद इकबालचे वय २२ वर्ष असले तरी त्याने आंतरराष्ट्रीय मॅच खेळली आहे. या यादीतील आणखी एक नाव म्हणजे साहिबदाजा फरमान होय. ज्याचे वय २७ वर्ष आहे. अंतिम सामन्यात अर्धशतक करणारा सायम अयूबचे वय २१ असले तरी त्याने पाककडून ८ टी-२० मॅच खेळल्या आहेत.

राष्ट्रीय संघाकडून एक वनडे मॅच खेळणारा कमरान गुलाम याचे वय देखील २७ वर्ष आहे. जलद गोलंदाज अमाद बट्टचे वय २८ असून त्याने आंतरराष्ट्रीय मॅच खेळली आहे. तसेच अरसद इकबालचे वय २२ वर्ष असले तरी त्याने आंतरराष्ट्रीय मॅच खेळली आहे. या यादीतील आणखी एक नाव म्हणजे साहिबदाजा फरमान होय. ज्याचे वय २७ वर्ष आहे. अंतिम सामन्यात अर्धशतक करणारा सायम अयूबचे वय २१ असले तरी त्याने पाककडून ८ टी-२० मॅच खेळल्या आहेत.

# हा आमच्यासाठी कठीण क्षण

## » चौथ्या सामन्यानंतर बेन स्टोक्सची प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात मँचेस्टर येथे खेळवण्यात आलेला ॲशेस मालिकेतील चौथा कसोटी सामना अनिर्णित राहिला. या सामन्याच्या अनिर्णायक निकालामुळे इंग्लंड संघाचे मोठे नुकसान झाले आहे. यजमानांनी २०१५ नंतर प्रथमच ॲशेस जिंकण्याची सुवर्णसंधी वाया घालवली.**




### ऑस्ट्रेलियाने मालिका कायम राखली

या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी उतरलेल्या ऑस्ट्रेलिया संघाने पहिल्या डावात ३१७ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये मार्नस लाबुशेन (५१) आणि मिचेल मार्श (५१) यांनी अर्धशतकं झळकावली होती. इंग्लंडने पहिल्या डावात ५९२ धावांची मजल मारली. यात जॅक क्रॉलीच्या १८९ आणि जॉनी बेअरस्टोच्या नाबाद ९९ धावांचा समावेश होता. पहिल्या डावाच्या जोरावर इंग्लंडने २७५ धावांची आघाडी घेतली होती. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात पावसाने सामना अनिर्णीत होण्यापूर्वी ५ बाद २१४ धावा केल्या होत्या.

या सामन्यात एकवेळ इंग्लंड विजयाच्या जवळ पोहोचले होते. त्यानंतर पावसामुळे हा सामना अनिर्णीत राहिला. त्यामुळे संघाचा कर्णधार बेन स्टोक्स खूपच निराश झाला आहे. त्याने यावर आता प्रतिक्रिया दिली आहे. सामना संपल्यानंतर बेन स्टोक्स म्हणाला, "तुम्हाला माहित आहे की हा आमच्यासाठी खूप कठीण क्षण आहे. आम्ही पहिले ३ दिवस ज्या प्रकारचे क्रिकेट खेळलो त्याचे परिणाम हवामानाने दिले नाहीत. खरे सांगायचे तर ही एक कठीण गोष्ट आहे. पण तो आमच्या खेळाचा भाग आहे. या सामन्यात येण्यापूर्वी आमच्यासाठी करो या मरो अशी परिस्थिती होती. ऑस्ट्रेलियाला ३२० च्या आसपास आऊट करणे आणि नंतर ५९० धावा करणे, आम्ही याच्यापेक्षा जास्त काही करू शकलो नसतो. बेन स्टोक्स पुढे म्हणाले, आमचा एक सामना बाकी आहे आणि आम्हाला विजय मिळवून २०१९ प्रमाणे ही मालिका बरोबरीत राखायची आहे. हा शेवटचा सामना एक संघ म्हणून आमच्यासाठी किती महत्वाचा आहे, हे आम्हाला माहीत आहे. आम्हाला चांगला पाठिंबा मिळाला आहे .

# रोहित शर्माने रचला इतिहास

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि वेस्ट इंडिजमधील दुसरा कसोटी सामना निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. सामन्याच्या चौथ्या दिवशी वेस्ट इंडिजला २५५ धावांत गुंडाळल्यानंतर भारतीय संघाने दमदार सुरुवात केली. कर्णधार रोहित शर्मा तर वेगळ्याच मूडमध्ये होता. त्याने ५७ धावांची जलद खेळी खेळली. भारतीय कर्णधाराने ४४ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकार ठोकले.

पहिल्याच चेंडूपासून तो शानदार फटकेबाजीच्या मूडमध्ये होता आणि त्याने वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांची चांगलीच शाळा घेतली. रोहित शर्माने सर्वात जलद अर्धशतक झळकावत आपल्या नावे काही विक्रम केले आहेत. रोहित शर्माने अवघ्या ३५ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याच्या कसोटी कारकिर्दीतील हे सर्वात जलद अर्धशतक आहे. याआधी रोहितने २०२१ मध्ये इंग्लंडविरुद्ध चेन्नई कसोटीत ४७ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले होते. आता रोहितने तो विक्रम मोडीत काढला आहे.

रोहित शर्माने या खेळीत विश्वविक्रमही केला. १० धावांचा टप्पा गाठताच रोहितने हा विश्वविक्रम आपल्या नावावर केला. रोहितने सलग ३०व्या डावात कसोटीतील दुहेरी आकडा गाठला आहे. आतापर्यंत कोणत्याही फलंदाजाला ही कामगिरी करता आली नव्हती.